Impact Factor-8.575 (SJIF)

ISSN-2278-9308
(CCCLVI ) 356
June -2022



# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed
Multidisciplinary International Research Journal

## SPECIAL ISSUE ON
## Ancient Indian Iconography & Architecture

**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande

**Executive Editor**
Dr.Arvind Sontakke

This Journal is indexed in :
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com* Aadhar Publications Amravati (M,S)

मूर्तीशास्त्र संशोधन संस्था
(Regd. No. Mah. /387/2022 Pune )
भारतीय मूर्ती आणि स्थापत्य संशोधन परिषद
दुसरे राष्ट्रीय अधिवेशन
कार्यकारी संपादक
डॉ अरविंद सोनटक्के
संपादकीय मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे, | डॉ.राजेशर गडे, | डॉ. नितीन सराफ, | श्री. भुजंग बोबडे |
| श्री. लक्ष्मीकांत सोनवटकर, | डॉ. सुरेंद्र शिरसट, | डॉ. ज्योती पेटकर , | डॉ. शांता जाधवर |

(या अंकात व्यक्त केलेली मते हि परिषद अथवा संपादक मंडळ यांची अधिकृत मते नाहीत,
त्यांच्याशी ते सहमत असतीलच असे नाही )

मूर्तीशास्त्र संशोधन संस्था
कार्यकारिणी

अध्यक्ष: डॉ. अरविंद सोनटक्के, दिगंबरराव बिंदू कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भोकर, जि नांदेड.
उपाध्यक्ष: श्री. लक्ष्मीकांत सोनवटकर, परभणी जिल्हा प्राचीन मूर्ती व मंदिर सर्वेक्षण समिती सदस्य, चारठाणा, जि .परभणी
सचिव: डॉ. सुरेंद्र शिरसट, कला महाविद्यालय, भिगवण, जि पुणे
कोषाध्यक्ष : डॉ. रामभाऊ मुटकुळे, हुतात्मा बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत, जि हिंगोली
सदस्य: डॉ. ज्योती पेठकर, लोकनेते गोपिनाथजी मुंडे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांडणगड, जि रत्नागिरी
डॉ. शांत जाधवर, श्याम गदळे कला महाविद्यालय, दहिफळ (वडमाऊली) जि बीड
डॉ. कामाजी डक, पोस्ट डॉक्टरल फेलो, डॉ बा आं म वि, औरंगाबाद

भारतीय मूर्ती आणि स्थापत्य संशोधन परिषद
कार्यकारिणी

अध्यक्ष: डॉ.प्रभाकर देव, ज्येष्ठ इतिहास संशोधक, मूर्तीशास्त्र व मंदिर स्थापत्यातील तज्ञ, नांदेड
उपाध्यक्ष: डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे, प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातन विभाग, रा तू म ना वि,नागपूर
सचिव: डॉ. नितीन सराफ, श्रीमती रा सा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी ,जि अमरावती
सहसचिव: डॉ.राजेश रगडे, पर्यटन प्रशासन विभाग, डॉ बा आं म वि, औरंगाबाद
कोषाध्यक्ष : डॉ राजेंद्र धाये, संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि जालना
सदस्य: डॉ.माया पाटील, विभाग प्रमुख, प्राचीन भारतीय इतिहास,संस्कृती व पुरातत्वशास्त्र, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
डॉ.श्रीकांत गणवीर, प्राचीन भारतीय इतिहास,संस्कृती व पुरातत्व विभाग, डेक्कन कॉलेज, पुणे
डॉ.लहू गायकवाड, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, पुणे
श्री. भुजंग बोबडे, संचालक, हेरीटेज फौंडेशन, जळगाव
डॉ.मेहेरज्योती सांगळे, एस एन डी टी महिला विद्यापीठ, मुंबई
प्रा. गोपाल जोगे, प्राचीन भारतीय इतिहास,संस्कृती व पुरातत्व विभाग, डेक्कन कॉलेज, पुणे संस्था सदस्य:
डॉ. अरविंद सोनटक्के, दिगंबरराव बिंदू कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भोकर, जि नांदेड.
श्री. लक्ष्मीकांत सोनवटकर,परभणी जिल्हा प्राचीन मूर्ती व मंदिर सर्वेक्षण समिती सदस्य, चारठाणा, जि.परभणी

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, 356 (CCCLVI)
ISSN : 2278-9308 June, 2022

## INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | मध्य भारतातील प्रागैतिहासिक कलेची भीमबेटका येथे एतिहासिक माहिती — Dr. Kautik N. Dandge | 1 |
| 2 | अजिंठ्याच्या चित्रावरून तत्कालीन वस्त्रनिर्मितीचा अभ्यास. — प्रा. शिल्पा विश्वरूपे , डॉ. सायली पांडे | 8 |
| 3 | बृहदेश्वरा मंदिरातील चोलकालीन शिव त्रिपुरांतक चित्रावर अभ्यास — डॉ. मिनल राजूरकर | 14 |
| 4 | नांदेड जिल्ह्यातील हिंदू लेणी : एक ऐतिहासिक अवलोकन — डॉ. राजाराम रा पिंपळपल्ले | 19 |
| 5 | एकपाषाणी मंदिर आणि लेणी समूह: कडवे, (जिल्हा सातारा) — दीप्ती कुलकर्णी | 23 |
| 6 | खालापूर तालुक्यातील हाळखुर्दची लेणी — प्रा. नागोराव तारू | 27 |
| 7 | बौद्ध लयन स्थापत्यकला — अश्विनी पतंगे | 33 |
| 8 | वीरगळा वरील विविध देवता व पंथ — श्री अनिल किसन दुधाणे | 39 |
| 9 | केदारेश्वर मंदिर, परळी; रामेश्वर मंदिर, गुरसाळे; कात्रेश्वर मंदिर, कातरखटाव आणि भैरवनाथ मंदिर, किकली... एक तौलनिक अध्ययन. — आदित्य फडके | 46 |
| 10 | भाळवणी येथील प्राचीन मंदिरे — प्रा. डॉ. रविकिरण जाधव , श्री.ज्ञानेश्वर सतिश झरकर | 51 |
| 11 | राष्टकुटकालीन कैलासमंदिर एक शिल्प स्थापत्य — प्रा.राजश्री गुणाजीराव भोपाळे | 57 |
| 12 | जामखेडच्या खडकेश्वर मंदिरातील काम शिल्प — प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के | 61 |
| 13 | कैलास लेणीतील रावणानुग्रह शिल्प — डॉ अरविंद सोनटक्के , सौ. वर्षा अरविंद सोनटक्के | 66 |
| 14 | परभणी जिल्ह्यातील चामुंडा विश्लेषण — लक्ष्मीकांत सोनवटकर | 69 |
| 15 | मातृका– एक अध्ययन — अजय पेंडसे | 80 |
| 16 | तळेगाव ढमढेरे येथील मूर्ती शिल्पाची ओळख — कु.प्रसाद प्रकाश तकटे | 84 |
| 17 | धामणगाव (जि.सोलापूर) अजमुखी नेगमेश : एक दुर्मिळ प्रतिमा — प्रा. डॉ. माया ज. पाटील , ज्ञानेश्वरी बाळकृष्ण हजारे | 87 |

ISSN : 2278-9308
June, 2022

# जामखेडच्या खडकेश्वर मंदिरातील काम शिल्प

प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के
संशोधन मार्गदर्शक,प्रमुख, इतिहास विभाग,दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर. जिल्हा नांदेड.
9423139676,arvindsontakke72@gmail.com

जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यामध्ये 'जामखेड' नावाचे एक छोटेसे खेडेगाव असून, एकेकाळी बाहेरून पूर्णतः कोसळलेले हे शिवमंदिर ग्रामस्थांनी स्व-खर्चातून पुनश्च उभे केले आहे. मुखमंडप, सभामंडप, अंतराळ आणि गर्भगृह अशी मंदिराची रचना आहे. आज जे मंदिर उभे आहे त्याचा आकार ४२ फूट × ३१ फूट असा आहे. मंदिराच्या विताना प्रमाणे एक गर्भगृह असलेले हे मंदिर होय.[१] मात्र मंडपाच्या दक्षिण भिंतीला आणि उत्तर भिंतीला अपूर्ण अशी दोन देवकोष्ठे आहेत. डॉक्टर प्रभाकर देवांच्या मते, 'त्रिदल पद्धतीच्या मंदिराची सुरुवात येथे दिसते.'[२] मंदिराच्या सभोवताली अर्धचंद्राकार वेढलेली 'घामवती' नदी मंदिराच्या सौंदर्यात अधिक भर घालते. आज हे मंदिर अतिशय चांगल्या अवस्थेत दिसत असले तरी, ग्रामस्थांनी केलेले नूतनीकरण मंदिराच्या बाह्यभागावर असलेल्या शिल्पकलेला बाधक ठरले आहे. कारण मुळ मंदिराच्या बाह्य भागावर कोरलेली शिल्प आज नूतनीकरणा मुळे अस्तित्वात राहिली नाहीत. मंदिराच्या बाह्यभागावर शिल्पकला होती का नव्हती हे ही कळण्यास आज कोणताही मार्ग उपलब्ध नाही. मंदिराचे शिखर विटांनी बांधलेले होते.[३]

**शोध निबंधाचा उद्देश:-** मंदिर आणि मूर्ती शास्त्राचे अभ्यासक असलेल्या पूर्वसुरींच्या लेखनात काम विकार बाहेर ठेवून मंदिरात प्रवेश करावा; हा सिद्धांत चुकीचा असून काम हे मानवी जीवनाचे एक प्रमुख अंग आहे. मंदिरासारख्या पवित्र ठिकाणी तंत्रशास्त्राच्या प्रभावातून काम शिल्पे कोरली गेली. ते 'विकार' नसून 'संस्कार' याचाच एक भाग होता. हे सिद्ध करणे होय.

**स्थळ** :- (19.6177° N, 75.7957° E)

औरंगाबाद पासून अग्नेय दिशेला पंचाहत्तर किलोमीटर अंतरावर प्रस्तुत गाव आहे. गावाजवळ असलेल्या जांबुवंत लेण्या वरून या गावाचे नाव जामखेड पडले आहे. त्याचे पूर्वीचे नाव 'जंबूखेड' असे होते. नंतर हे स्थळ 'जामखेड' असे झाले.[४]

**महत्त्वपूर्ण शब्द:-** कामशिल्प, मंदिर, कामासने, रतिक्रीडा, चुंबन, आलिंगन इत्यादी.

**संशोधन पद्धती :-** प्रस्तुत शोध निबंधात प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा उपयोग करून खडकेश्वर मंदिरातील काम शिल्पांचे विश्लेषण करण्यात येईल.

**मुख्य विषय:-** जामखेडचे हे मंदिर 'खडकेश्वर महादेव' मंदिर म्हणून ओळखले जाते. मंदिर पश्चिमाभिमुख आहे. जामखेड गावाबाबत ग्रामस्थांकडून एक अख्यायिका सांगितली जाते. रामायण काळामध्ये जांबुवंत आणि हनुमानाची लढाई याच गावात झाली असल्याचे सांगतात. गावाजवळच असलेल्या एका टेकडीवर जाबुवंताचे मंदिर आहे. हे मंदिर डोंगरकपारीत कोरलेली एक गुहा आहे. प्रस्तुत गुहा पाहतांना इथे लेणी कोरण्याचा प्रयत्न झाला असावा. परंतु दगडांमध्ये ठिसूळपणा अधिक असल्यामुळे सदरील काम अर्धवट सोडण्यात आले असावे. हीच जागा ग्रामस्थ जांबुवंत मंदिर म्हणून दाखवतात. महाराष्ट्रातील शहरापासून खेड्यापाड्यापर्यंत मारुतीचे मंदिर पहावयास मिळते. परंतु जामखेड च्या परिसरात मारुती चे मंदिर कुठेही आढळून येत नाही. ही या परिसरातील विशेष उल्लेखनीय बाब आहे असे म्हणावे लागेल. जाबुवंत आणि हनुमानाच्या लढाईत जाबुवंताचा घाम इथे ठिबकला असल्याने या नदीस घामवती नावाने ओळखली जाते.

जामखेडच्या खडकेश्वर मंदिराचे स्थापत्य पाहता उत्तर चालुक्यकालीन आणि पूर्व यादवकालीन राजवटीचा प्रभाव मंदिरावर स्पष्ट जाणवतो. मंदिराच्या बाहेर स्वतंत्र नंदीमंडप असून तो यादव काळात निर्माण केलेला आहे. खडकेश्वर मंदिर-पीठ इतर चालुक्यकालीन मंदिराप्रमाणेच असावे. परंतु सध्या ग्रामस्थांनी केलेल्या विविध कामांतर्गत हे पीठ पूर्णपणे जमिनीत गाढले गेले आहे.

मंदिराच्या मुख्य मंडपास चार कोरीव अर्धस्तंभांनी तोलून धरलेले आहेत. हे चारही स्तंभ कक्षासनावर उभे असून त्यावर कोरीव नक्षीकाम आहे. सभामंडपाला आठ कोरीव स्तंभ असून रंगशिळा ही अष्टकोनी आहे.[५]

**रंगमंडप:-** मंडपाच्या मध्यावर अष्टकोनी रंगमंडप आहे. रंगमंडपाच्या आठ गुणांवर आठ कोरीव स्तंभ उभे आहेत. यातील काही स्तंभांवर कामशिल्प कोरलेली आढळून येतात.

**स्तंभ क्रमांक एक:-**

रंग शिळेच्या स्तंभ क्रमांक एक च्या तळ भागावर ६ × ८ इंच आकाराचे उत्तान लिंग हाती घेतलेले पुरुषाचे शिल्प आहे. उत्तान लिंग देवतेला दाखविणे हा तांत्रिक पूजेचा भाग आहे. या मध्ये वीर्य देवतेला अर्पण केले जाते. उत्तेजित लिंगाचे चाळे किंवा हालचाल करून पूजन केले जाते.[६] याच स्तंभावरील उत्तर दिशेस एक प्रसव शिल्प १० × ८ इंच आकाराचे कोरलेले असून त्यात स्त्रीने हात जोडून बाळाला जन्म देत असताना शिल्पांकित केले आहे. हे शिल्प पूर्णतः सृजनशी नाते सांगणारे शिल्प असून कदाचित असे दोन्ही हात जोडून नमस्कार मुद्रेत कोरलेले एकमेव 'प्रसव' शिल्प असावे.

**स्तंभ क्रमांक चार:-**

रंगशिळेवर असलेल्या एकूण आठ स्तंभापैकी प्रदक्षिणा क्रमाने चौथ्या स्तंभावर पूर्वमुखी स्तंभ-मध्यावर एक कामशिल्प कोरलेले आहे. हे कामशिल्प १५ इंच × ६ इंच कोरलेले असून, याच स्तंभाच्या खाली एक प्रसव शिल्प ८.६ इंच × ६.६ इंच कोरलेले आहे. प्रस्तुत कामशिल्प काम शास्त्रीय ग्रंथानुसार, रतिमार्ग आसन या नावाने ओळखले जाते. या आसनात उताणी झोपलेल्या स्त्रीवर पडून तिचे दोन्ही स्तन हाताने मर्दन करीत समागम केल्यास तो 'रतिमार्ग बंध' होय असे म्हटले जाते. [७] इतर काही आचार्यानी यास 'रतिपाश आसन' असेही म्हटले आहे.[८] स्त्रीच्या दोन्ही जांघेत घुसून अतिगाढ अलिंगन देत समागम करीत असल्यास त्या रतिक्रिडेला 'केयूर' आसन म्हणतात. [९] यास श्री कल्याणमल्ल हे 'सौम्य' नामक आसन असे म्हणतात. [१०] समागम करणारा पुरुष स्त्रीच्या वर उचललेल्या दोन्ही मांड्या एकमेकांना भिडवून समागम करीत असल्यास त्यास 'गगनक' आसन म्हणतात. [११] प्रस्तुत शिल्पाचा आकार खूप लहान असल्याने स्त्रीच्या मांड्या एकमेकांना भिडवून आहेत का हे स्पष्ट दिसत नाही. या समागम शिल्पाच्या बाजूला एक पुरुष बसलेला असून त्याने आपली मान तिरकी वळवलेली आहे. जणू काही तो इशारा करीत असावा. तंत्र शास्त्रात गुरु तांत्रिक समागम शिकवत असल्याने हे शिल्प तंत्र शास्त्रानुसार तयार केलेले आहे. समागम करीत असलेली व्यक्ती ही कुणीतरी महत्वपूर्ण व्यक्ती असावी. कारण त्यांच्या शेजारी बसलेले तांत्रिक गुरु हे यांचा समागम पहात नाहीत. तसेच तांत्रिक गुरु हे गुढग्यावर बसलेले असून साधनेच्या आवर्तनात आहेत. गुढग्या जवळ एक कमंडलू दाखविलेला आहे. हा साधू कापालिक साधू नसावा कारण त्याच्या जवळ दंड, रुद्राक्ष, कडा असे काही दिसत नाही. तर हा साधू यादव काळातील असावा असे वाटते. तसेच प्रस्तुत समागम शिल्पातील गतिमानता किंवा वीर्य निष्काशित करण्याचा अवधी समीप आला असल्याचे दाखविण्यासाठी पुरुषाचे वृषण हवेत दाखवलेली आहेत. याच स्तंभावर गर्भगृहा कडे मुख करून असलेले 'प्रसव' शिल्प कोरलेले आहे.

**स्तंभ क्रमांक सहा:-**

15 इंच × 6.6 इंच आकाराचे रंग शिळे वरील प्रदक्षिणा क्रमाने स्तंभ क्रमांक 6 च्या मध्य भागावर तीन भागात शिल्पांकन केलेले आढळून येते. पहिल्या भागात आपले दोन्ही हात वर घेऊन आळस देत असलेली अलस कन्या कोरण्यात आलेली आहे. ही अलस कन्या नग्न दाखवण्यात आली आहे. शिल्पाच्या दुसऱ्या भागात उत्तेजित लिंग हाती घेतलेले शिल्प असून ते तांत्रिक विधीचे संकेत देतात. तिसऱ्या भागात रती पूर्व क्रीडा करीत असलेले युगल कोरलेली आहेत. स्त्री ही समागमाच्या बाबतीत निसर्गतः लांब असते. तिला फुलवण्यासाठी, रुंजी घालण्यासाठी जे प्रयोग केले जातात त्यास काम शास्त्रज्ञांनी 'बाह्यरत' असे नाव दिलेले आहे. बाह्यरत मिलनाचा आनंद देणारे अद्भुत रहस्य आहे. या रहस्याची उकल आलिंगन, चुंबन, नख क्षत व दंत क्षत या क्रियातून होते. स्त्रियांच्या काम व्यवहारासंबंधी रिचर्ड म्हणतात, "This is all the more important in view of the widely held traditional Indian belief that a woman has greater need of sexual satisfaction than a man." [१२] प्रस्तुत शिल्प आलिंगन आणि स्तन मर्दन करीत असतानाची असून आलिंगन म्हणजे भेट एवढाच अर्थ आपण घेतो पण काम शास्त्रज्ञांनी यातही अनेक भेद दिलेले असून प्रत्येक आलिंगन जे वेगवेगळ्या स्थितीत, वेगवेगळ्या रुपाने स्पष्ट झालेले आहे. आलिंगन या बाह्यरती चे दोन प्रकार आहेत.

1. दर्शन 2. स्पर्शन

एकमेकाकडे पाहिल्याने उत्पन्न होणाऱ्या प्रेमाला 'दर्शन रती' व एकमेकास स्पर्श करून उत्पन्न होणाऱ्या प्रेमाला 'स्पर्शन रती' म्हणतात. [१३]

**स्तंभ क्रमांक सात:-**

रंग शिळे वरील स्तंभ क्रमांक सात ज्याच्या उत्तर दिशेस एक तांत्रिक विधीचे शिल्प कोरण्यात आलेले आहे. प्रस्तुत शिल्पाचा आकार 15 इंच × 6 इंच आहे. या शिल्पांमध्ये पाठीवर कमंडलू घेतलेला एक तांत्रिक योगी असून तो काहीतरी सूचना देत आहे. ह्या तांत्रिक साधूची मूर्ती एखाद्या रामदासी प्रमाणे दिसते. लांब केस आणि पाठीवर कमंडलू

आहे. शिल्प मध्यात एक स्त्री आहे. जिने आपल्या पाठीमागे उभ्या असलेल्या पुरुषाचे उत्थित लिंग हाती धरलेले आहे. तर त्या पुरुषाच्या पाठीमागे एक स्त्री उभी असावी असे वाटते.

गर्भगृहाच्या डाव्या कोपऱ्यात देव कोष्टकाच्या बाजूस 7 इंच x 6 इंच आकाराचे एका स्तंभावर चुंबन घेत असलेल्या स्त्री-पुरुषाचे शिल्प असून समोर एक तांत्रिक योगी हात जोडून प्रार्थना करीत असताना दिसत आहे. त्याच्यासमोर एक कुंभ ठेवलेला दिसतो. प्रस्तुत शिल्पातील स्त्री-पुरुष थोडीसे मान वळवून ओठांचा चंबू करून एकमेकांच्या ओठांचे चुंबन घेत असतील यास कामसूत्रात 'तिर्यंक चुंबन' असे म्हटले आहे. [१४] या शिल्पात स्त्रीने साधूचे केस हाती धरलेले आहेत. तांत्रिक विधी मध्ये केस चमत्कारिक शक्तीचे प्रतिक मानले जाते. तांत्रिक ग्रंथ 'कर्पूरदृष्ट्यम' यात केस आणि मैथुन यांचा सहसंबंध स्पष्ट करण्यात आला आहे. यानुसार 'विरसाधना' या विधीत स्मशानात रात्री 'वीर्य' व 'केस' देवतेला अर्पण केल्यास सर्व लौकिक सुखाची प्राप्ती होते.[१५] असे सांगितले आहे. काक्षासनाच्या खालील भागावर देखील हातात उत्तेजित लिंग घेऊन उभे असलेले साधक कोरलेले दिसून येतात. ज्यांचा तांत्रिक पुजेशी असलेला सहसंबंध दाखविण्यात आला आहे.

भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिर यांच्या वतीने देण्यात येणारा पहिला सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर स्मृती पुरस्कार वितरण प्रसंगी मूर्तीशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी, "गोपुरांवरच्या स्त्री प्रतिमा 'Fertility Goddess' नाहीत." असे प्रतिपादन केले आहे. या प्रसंगी बोलताना डॉ गो. बं. देगलूरकर म्हणतात, "प्रदक्षिणा घालत असताना काम, क्रोध, मद आदींचा त्याग करण्यासाठी ती योजना असते."[१६] असे असेल तर, मंदिराच्या रंगशिळा स्तंभावर काम शिल्प कोरली गेलीच नसती.

सारांश रूपाने असे म्हणता येईल की,

१. मंदिर हे केवळ धार्मिक केंद्र नसून ते तांत्रिक विधीच्या माध्यमाने लैंगिक शिक्षण देणारे केंद्र होते.

२. मंदिराच्या बाह्यांगावर असलेल्या अलस कन्या या फक्त मंदिर शुशोभीकरण करण्यासाठी कोरण्यात आल्या नव्हत्या तर त्या भक्ताला आकर्षित करण्यासाठीच निर्माण करावेत, असे 'शिल्पप्रकाश' ग्रंथात उल्लेख करण्यात आला आहे.[१७]

३. मनुष्यास सांगितलेले चतुर्विध पुरुषार्थाचे पालन करीत अध्यात्मिक उन्नती साधावी हे मंदिरातील सभा मंडपातील रंग शिळेच्या स्तंभावर असलेल्या कामाशिल्पातून स्पष्ट होते.

४. जामखेडच्या खडकेश्वर मंदिरातील कामशिल्प हे प्रमाणाबध्द नसल्याने प्रस्तुत मंदिर उत्तर चालुक्य कालीन आणि पूर्व यादव कालीन असावे. तसेच मंदिराच्या समोर असलेले नंदी मंडप हे पूर्णतः यादव कालीन स्तंभावर उभे आहे.

संदर्भ

1. डॉ. प्रभाकर देव, अनु., कल्पना रायरीकर, मराठवाड्यातील प्राचीन मंदिर स्थापत्य शिल्पाविष्कार, अपरांत, प्रथम आवृत्ती २०१७, पृ. क्र. ३६
2. कित्ता पृ. क्र. ३६
3. कित्ता पृ. क्र. ३५
4. कित्ता पृ. क्र. ३४
5. कित्ता पृ. क्र. ३६
6. Devangana Desai, Erotic sculptures of India – A socio-cultural study, Munshiram Manoharlal Publishers Pvt. Ltd., New Delhi, 1985, P. 81
7. डॉ चव्हाण दलवीर सिंह, संपा., शृंगाररसप्रबंधदीपिका, (३/४६) चौ. सं. सी. ऑफिस, वाराणसी, २००६, पृ. ११३.
8. डॉ चव्हाण दलवीर सिंह, संपा., स्मरदीपिका, (८५) चौ. सं. सी. ऑफिस, वाराणसी, २००४, पृ. ३९.
9. डॉ चव्हाण दलवीर सिंह, संपा., स्मरदीपिका, (८६) चौ. सं. सी. ऑफिस, वाराणसी, २००४, पृ. ३९.
10. डॉ रामसागर त्रिपाठी, अनु., अनंगरंग (१०/१०) चौ. सं. प्रतिष्ठान, दिल्ली, २००४, पृ. २९६
11. डॉ चव्हाण दलवीर सिंह, संपा., स्मरदीपिका, (९७,९८,१०१) चौ. सं. सी. ऑफिस, वाराणसी, २००४, पृ. ४२-४३
12. Lannoy Richard, The Speaking tree, London Oxford University Press, Newyork, 1971, p. 115
13. डॉ चव्हाण दलवीर सिंह, संपा., शृंगाररसप्रबंधदीपिका, (२/३२) चौ. सं. सी. ऑफिस, वाराणसी, २००६, पृ. ५४.
14. Devangana Desai, Erotic sculptures of India – A socio-cultural study, Munshiram Manoharlal Publishers Pvt. Ltd., New Delhi, 1985, P. 141
15. डॉ शास्त्री आचार्य रामचंद्र, अनु., वात्सायन का कामसूत्र, (२/३/११), मनोज पब्लिकेशन, दिल्ली, २००४, पृ. ९२.

16. लोकमत, नागपूर आवृत्ती, २५ सप्टेंबर २०२१.
17. र. पु. कुलकर्णी अनु., शिल्पप्रकाश, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, जानेवारी २०००, पृ. ४३

स्तंभ क्र. १



स्तंभ क्र. १ प्रसूती शिल्प



काक्षासनावरील बाह्य भिंती वरील तांत्रिक विधी शिल्प



स्तंभ क्र. ४ तांत्रिक समागम



स्तंभ क्र. ६



स्तंभ क्र. ७



सभामंडपातील शिल्प

